Maharashtra State Board of
Secondary & Higher Secondary Education
S.R.No.832-A, Final Plot No. 178,179, Near
Balchitrawani, Behind Agharkar Research
Institute, Bhamburda, Shivajinagar,
Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
स.न.८३२-ए, फा.प्लॉ.नं.१७८,
१७९,बालचित्रवाणी शेजारी, आघारकर
रिसर्च इन्स्टिटयूटच्या मागे, भांबुर्डा,
शिवाजीनगर, पुणे ४११००४

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 । EPABX -25705000 Fax : 25665807 ।
Email : secretary.stateboard@gmail.com

क्र. रा.म./परीक्षा-८/ ६८२४
पुणे - ४११००४
दिनांक - १६ डिसेंबर, २०२२

प्रति,

विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे.

**विषय-** उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी ) परीक्षा फेब्रुवारी–मार्च २०२३ विद्यार्थ्यांची अतिविलंब/विशेष अतिविलंब/ अतिविशेष अतिविलंब शुल्काने परीक्षेची आवेदनपत्रे स्विकारण्याच्या तारखांबाबत...

**संदर्भ :-** १. शासनाचे पत्र क्र.एसएससी-२००२(६६/०२)/उमाशि-२ दिनांक २३ एप्रिल, २००३.
२. शासनाचे पत्र क्र.एसएससी-२०११(१८५/११)/उमाशि-२ दिनांक ११ फेब्रुवारी, २०१३.

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, मंडळ विनियम १९७७ नियम क्र. ९३ अन्वये फेब्रुवारी–मार्च २०२३ मध्ये होणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांची नियमित व विलंब शुल्कासह परीक्षेची आवेदनपत्र ऑनलाईन स्विकारण्याची मुदत दि. ०२/१२/२०२२ रोजी संपुष्टात आली आहे.

आवेदनपत्र सादर करण्याची निर्धारीत मुदत संपल्यानंतर (१) श्रेणी/तोंडी/प्रात्यक्षिक परीक्षा सुरु होण्यापूर्वी ३० दिवसाचा कालावधी वगळून त्याअगोदर प्रतिदिनी रु. ५०/- याप्रमाणे अतिविलंब शुल्क, (२) अतिविलंब शुल्काच्या निर्धारित तारखेनंतर लेखी किंवा प्रात्यक्षिक परीक्षेच्या आगोदर जी परीक्षा सुरु होणार आहे, त्यातील सुरुवातीच्या १५ दिवसापर्यंत प्रती विद्यार्थी प्रती दिन रु. १००/- विशेष अतिविलंब शुल्क व तद्नंतरच्या १५ दिवसांकरीता व परीक्षेच्या आदल्या दिवसापर्यंत (दि. २०/२/२०२३ पर्यंत) रु. २०० प्रमाणे अतिविशेष अतिविलंब शुल्क आकारुन आवेदनपत्र स्विकारण्याच्या तारखा खालीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहेत.

लेखी परीक्षा दि. २१/०२/२०२३ रोजी सुरू झाल्यानंतर कोणत्याही नियमित, पुनर्परीक्षार्थी, श्रेणीसुधार, खाजगी विद्यार्थी, तुरळक व आय.टी.आय. विषय घेणा–या विद्यार्थ्यांची परीक्षा आवेदनपत्रे स्विकारली जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

| परीक्षा | अतिविलंब शुल्क अंतिम मुदत (रु. ५०/- प्रतिदिनी, प्रतिविद्यार्थी प्रमाणे) | विशेष अतिविलंब शुल्क अंतिम मुदत (रु. १००/- प्रतिदिनी, प्रतिविद्यार्थी प्रमाणे) | अति विशेष अतिविलंब शुल्क अंतिम मुदत (रु. २००/- प्रतिदिनी, प्रतिविद्यार्थी प्रमाणे) |
|---|---|---|---|
| उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षा | सोमवार दिनांक १९/१२/२०२२ ते गुरूवार दिनांक १२/०१/२०२३ | शुक्रवार दिनांक १३/०१/२०२३ ते शुक्रवार दिनांक ०३/०२/२०२३ | शनिवार दिनांक ०४/०२/२०२३ ते सोमवार दिनांक २०/०२/२०२३ |

सदर आवेदनपत्र कनिष्ठ महाविद्यालयाने ऑनलाईन पध्दतीने www.mahahsscboard.in या संकेतस्थळावर भरावयाची आहेत. त्यानंतर विद्यार्थी व प्राचार्य यांच्या स्वाक्षरीसह आवेदनपत्राची **Print Out** व आवेदनपत्र जमा करण्याच्या दिवसांपर्यंतचे अतिविलंब/विशेष अतिविलंब/अतिविशेष अतिविलंब शुल्क घेण्यात यावे. सदर शुल्क प्राप्त झाल्यानंतरच अर्ज ग्राहय धरण्यात येईल.

*** विभागीय मंडळाच्या परीक्षा शाखेने प्राप्त शुल्क व ऑनलाईन आलेली आवेदनपत्रे यांची तपासणी करणे आवश्यक आहे.**

(पुढील पानावर)

प्रचलित पध्दतीप्रमाणे विशेष अतिविलंब शुल्कासह आवेदनपत्रे स्विकारण्याच्या तारखा व सर्व सूचनांचे परिपत्रक संबंधित उच्च माध्यमिक शाळा प्रमुखांना सोबतच्या नमुन्याप्रमाणे (परिशिष्ट अ) विहीत प्रपत्रांसह पाठविण्यात यावे. तसेच संदर्भीय पत्रात नमूद केल्याप्रमाणे अतिविलंब/विशेष अतिविलंब/अतिविशेष अतिविलंब शुल्कानुसार आवेदनपत्रे स्विकारावीत.

मात्र अशा विद्यार्थ्यांना विभागीय मंडळ निश्चित करेल त्याच परीक्षाकेंद्रावर परीक्षा द्यावी लागेल. तसेच त्याचा निकाल इतर विद्यार्थ्यांबरोबर जाहीर होवू शकला नाही तरी विद्यार्थी त्यास हरकत घेऊ शकणार नाही, असे विद्यार्थ्यांकडून हमीपत्र घेण्यात यावे. ही बाब उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयामार्फत विद्यार्थ्यांना सूचित करावी व त्याबाबतची अंमलबजावणी प्राधान्याने करण्यात यावी.

सोबत जोडलेल्या विहीत तक्यामध्ये विद्यार्थ्यांबाबतची संपूर्ण अचूक माहिती (कालावधी व दंडाची रक्कम) तपासून सदर तक्ता (परिशिष्ट ब) मा. विभागीय अध्यक्ष यांची शिफारशी व स्वाक्षरीसह मा. अध्यक्ष, राज्यमंडळ यांचे मंजूरीकरिता पाठविण्यात यावा. **मा. अध्यक्ष, राज्यमंडळ यांच्या मंजुरीशिवाय सदर विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ठ होणार नाहीत याची दक्षता घेण्यात यावी.** मा. अध्यक्ष, राज्यमंडळ यांचेकडे विद्यार्थ्यांकडून परस्पर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही, याबाबतही सर्व माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांना कळविण्यात यावे.

कनिष्ठ महाविद्यालयाकडून प्राप्त झालेला माहितीचा तक्ता (परिशिष्ट अ) राज्यमंडळाकडे पाठविण्यात येऊ नये. तसेच इतर कागदपत्रेही राज्यमंडळाकडे पाठवू नयेत. (उदा. विद्यार्थ्यांचा अर्ज, वैद्यकिय दाखला इ.) याबाबतची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतरच परिपूर्ण प्रस्ताव या कार्यालयास पाठविण्यात यावा.

राज्यमंडळ कार्यालयाकडून अतिविलंब/विशेष अतिविलंब/अतिविशेष अतिविलंब शुल्कासह आवेदनपत्र स्विकारण्याची मंजुरी दिनांक २१/०२/२०२३ पर्यंत घेण्यात यावी. तसेच राज्यमंडळ कार्यालयाकडून परीक्षा सुरु होण्यापूर्वी मंजुरी देणे शक्य होईल अशा बेताने अतिविलंब/विशेष अतिविलंब/अतिविशेष अतिविलंब शुल्काचे आवेदन पत्रांचे तक्ते राज्यमंडळाकडे सादर करण्यात यावेत. **कोणताही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी.**

(अनुराधा ओक)
**सचिव**
**राज्यमंडळ, पुणे ४.**

**सोबत –** परिशिष्ट 'अ', 'ब' व शुल्क आकारावयाचा तक्ता

---

**क्र.कोविमं./उमाप/**2604
**कोल्हापूर 416004**
**दि.16/12/2022**

**प्रति,**
**प्राचार्य,**
**सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविदयालये,**
**सातारा / सांगली / कोल्हापूर**

**उपरोक्त पत्रानुसार प्राचार्यानी आपल्या स्तरावर नोंद घेऊन उचित कार्यवाही करावी.**

**(डी.एस.पोवार)**
**विभागीय सचिव**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर**

**प्रत माहितीस्तव -**

1) **मा.शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर विभाग,कोल्हापूर**
2) **शिक्षणाधिकारी (माध्य) जि.प.सातारा / सांगली / कोल्हापूर**

Panwalkar/Circular

# परिशिष्ट-अ

## महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४.

परीक्षेचे नावः ------------------------------

विभागीय मंडळाचे नावः ----------- विभागीय मंडळ

प्रकरणिका क्रमांकः ------------------------

विद्यार्थ्यांची मुदतबाह्य आवेदनपत्रे स्विकारण्याबाबत शिफारस

**इ. १२ वी**

१) विद्यार्थ्यांचे नाव : ------------------------------------------------

२) क. म. वि. नाव व पत्ता : ---------------------------------------------

३) क. म. वि. सांकेतिक क्रमांक : -----------------------------------------

४) विद्यार्थ्यांना आवेदनपत्रे सादर करता आली नाहीत त्याबाबत खालील कारणासमोर (✓) खूण करावी.

अ ( ) विद्यार्थ्याचा प्रलंबित आजार — ब ( ) विद्यार्थ्याच्या पालकाचे आकस्मिक निधन

क ( ) नैसर्गिक आपत्ती — ड ( ) या खेरीज अन्य रास्त व योग्य कारण असल्यास

इ ( ) अनपेक्षित कारणामुळे विद्यार्थ्यास बऱ्याच कालावधीसाठी परगावी/परदेशी जाणे भाग पडल्यास.

५) उपरोक्त कारणाचे अनुषंगाने सादर केलेला पुरावा.

अ ( ) विद्यार्थ्याचा प्रलंबित आजार — ब ( ) विद्यार्थ्याच्या पालकाचे आकस्मिक निधन

क ( ) नैसर्गिक आपत्ती — ड ( ) या खेरीज अन्य रास्त व योग्य कारण असल्यास

इ ( ) अनपेक्षित कारणामुळे विद्यार्थ्यास बऱ्याच कालावधीसाठी परगावी/परदेशी जाणे भाग पडल्यास

**(याबाबत नियमित विद्यार्थ्यांची हजेरी तपासून सदरचे कारण ग्राह्य धरावे.)**

६) कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांची शिफारस :-

-------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------

**प्राचार्य स्वाक्षरी व शिक्का**

अ) अतिविलंबाचे एकूण दिवस : -------- ब) अतिविलंबाच्या दंडाची रक्कम ----------

क) दंड कशाप्रकारे भरला - रोख/चलन क्रमांक --------------------------------

ड) विभागीय अध्यक्षांची शिफारस ---------------------------------------

---------------------------------------

मी या प्रकरणी सादर करण्यात आलेल्या सर्व कागदपत्रांची छाननी केली असून, उमेदवाराने आवेदनपत्र उशीरा सादर करण्यासाठी दिलेले कारण योग्य आहे. केवळ अपवादात्मक प्रकरण म्हणूनच मंडळ विनियम क्रमांक १३ मधील तरतुदीनुसार उमेदवारांचा अर्ज स्वीकारावा अशी माझी शिफारस आहे. सदर विद्यार्थ्यांचे आवश्यक ते अतिविलंब शुल्क कार्यालयात जमा केले आहे.

**विभागीय अध्यक्षांची स्वाक्षरी,**
**विभागीय मंडळाचे नाव व शिक्का**